**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


जा.क्र.रानाआअ/MOH पदभरती/२०२६/ ९२२५७६ दि. २ सप्टेंबर, २०२६

## जाहिरात

## वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीद्वारे पदभरतीबाबत

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि. १३ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीद्वारे महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांच्या रिक्त पदांवर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत समकक्ष संवर्गातील आरोग्य अधिका-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी विभागातील आरोग्य अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते.

सदर जाहिरातीद्वारे प्राप्त सर्व अर्जांची छाननी केली असता, अर्जदार कोणत्या संवर्गातील आहे व वेतनश्रेणी कोणती आहे? याबाबतचा निश्चित बोध होत नाही. सदर बाब लक्षात घेता, अर्ज सादर केलेल्या अर्जदारांना कळविण्यात येते की, आपला अर्ज वैद्यकिय आरोग्य अधिकारी पदाकरीता पात्र ठरत आहे किंवा नाही हे तपासण्याकरीता आपणांस ई-मेलद्वारे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले असून सदर प्रपत्रात माहिती भरुन सदर प्रपत्र स्वाक्षरी व हार्ड कॉपीसह या कार्यालयाच्या nuhm.maharashtra18@gmail.com या ईमेल आयडीवर दि. ४ सप्टेंबर, २०२६ पर्यंत उपलब्ध करुन द्यावे.

### ईमेलद्वारे उपलब्ध करुन द्यावयाच्या बाबी:-

- प्रपत्र स्वाक्षरीसह व हार्ड कॉपीसह उपलब्ध करुन द्यावेत.
- प्रपत्रात नमूद प्रत्येक बाबींचे अभिलेख / दस्ताएवेज सोबत जोडणे आवश्यक आहे.
- अभिलेख / दस्ताऐवजावर प्रपत्रात नमूद क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.
- अभिलेख / दस्ताऐवज प्रपत्रातील क्रमांकानुसार एकत्रित पीडीएफ करून सादर करावीत.
- सोबत खालील कागदपत्रे जोडावीत.
  १) संबधित पदाकरीता दुरदृष्टी दस्ताऐवज (Vision Documents) (शब्द मर्यादा ५००).
  २) तीन वर्षाचा कृती आराखडा (Action Plan).
  ३) सदर पदाकरीता अर्जदारांच्या योग्यतेबाबतचे निवेदन जोडणे आवश्यक आहे (शब्द मर्यादा ५००).
- दि. ४ सप्टेंबर, २०२६ रोजीपर्यंत प्राप्त होणारी माहिती स्विकारण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. जगन्नाथ म.विरकर)
अतिरिक्त अभियान संचालक
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई